श्रीमती आशा शिवाजी कांबळे वगैरे वि.
श्री.प्रकाश केशव आवास्कर

## नियमीत दिवाणी दावा क्र. ७७/२०१८ मधील निशाणी क्र.२२ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१,२ व ५ यांनी कैफियत सादर करण्यास झालेला विलंब माफ करुन, कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

०२. प्रतिवादी अर्जात कथन करतात की, प्रतिवादी क्र. १ यांना दाव्याच्या समन्सची बजावणी अनुक्रमे दि. ०९/०४/२०१९ रोजी व दि.१०/०४/२०१९ रोजी झालेली आहे. प्रतिवादी दि. १६/०४/२०१९ रोजी न्यायालयात हजर झालेले आहेत. परंतु, त्यांना प्रकरणातील कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्यामुळे मुदतीत कैफियत सादर करता आलेली नाही. त्यामुळे कैफियत दाखल करण्याकरिता त्यांना विलंब झालेला आहे. तो विलंब त्यांनी माफ करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितलेली आहे.

०३. त्याउलट, वादींनी प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांनी सदरचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा असून किती विलंब झाला हे नमुद केलेले नसल्याचे कथन केलेले आहे व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले व उभयपक्षकारांतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादींनी, प्रतिवादींविरुध्द दि. ०७/०३/२०१८ रोजीचा कुलमुखत्यारपत्राचा दस्त रद्द करुन मिळण्यासाठी, ठरावाकरिता व निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १,२ व ५ यांना अनुक्रमे दि. ०९/०४/२०१९ व १०/०४/२०१९ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, प्रतिवादी मुदतीत कैफियत सादर करु शकलेले नाहीत. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाद्वारे कैफियत सादर करण्यास झालेला विलंब माफ करुन मागितलेला आहे.

०५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे

समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादींना जवळ-जवळ १ महिन्यांचा विलंब झालेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक असते. प्रतिवादींनी अर्जामध्ये त्यांना मुदतीत कागदपत्रे उपलब्ध झालेली नसल्याचे कारण नमुद केलेले आहे. परंतु, कोणती कागदपत्रे प्रतिवादींना कैफियत तयार करण्यासाठी आवश्यक होती, ती त्यांना कधी उपलब्ध झाली याबाबतचा तपशिल अर्जामध्ये दिलेला नाही. त्यामुळे अर्जातील कारण संयुक्तीक कारण असल्याचे दिसत नाही. परंतु, प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरिता प्रतिवादींना कैफियत सादर करण्याची परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादींनी विलंबाबत संयुक्तीक कारण न दिल्यामुळे अर्जाचा खर्च त्यांचेवर ठेवणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज(निशाणी क्र.२२) रक्कम रुपये ५००/-च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | खर्चाची रक्कम वादींना देण्यात यावी. खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १,२ व ५ यांना त्यांची कैफियत सादर कण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by Pradip Madan Mane
Date: 2021.01.13 15:56:03 +0530

दिनांकः १३/०१/२०२१
खालापूर.

**(श्री.पी.एम.माने )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खालापूर.